**फौ. कि .नं. २२/२०१६**

निर्मला आनंदा पाटील वि. आनंदा शिवराम पाटील

**निशाण नं. ५४/क**

**<u>वि.प.तर्फे साक्षीदार क्र.४</u>**

नाव – हंबीरराव केशवराव पाटील

वय – ६३ वर्षे

व्यवसाय – सामाजिक कार्य

पत्ता – भेडसगाव ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर

**<u>सरतपास सामनेवालातर्फे वकील श्री. आर.डी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, निर्मला आनंदा पाटील व आनंदा शिवराम पाटील हे पती पत्नी माझ्या गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना येथे बरीच वर्षे म्हणून संचालक म्हणून काम पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी देखील जिल्हा परिषद येथे सदस्य म्हणून कार्यरत होती.हे म्हणणे खरे आहे की, आजूबाजूच्या दहा ते बारा गावात माझे चांगले नाव आहे. ९९०५ या क्रमांकाच्या माझ्या गाडया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाचे नाव आनंदा केशव पाटील असे आहे. वि.प यांचे वडील शिवराम पाटील हे माझे गाववाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शिवराम पाटील हे आमच्या संस्थेत संचालक होते. माझा भाऊ आनंदा केशव पाटील याचे आनंदा शिवराम पाटील यांच्या घरी येणे जाणे होते याबाबत मला माहिती नाही. निर्मला आनंदा पाटील व माझा भाऊ आनंदा केशव पाटील यांचे विवाहयबाहय संबंध होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते जयतूर लॉज येथे सापडल्यानंतर आम्ही त्याबाबत तडजोड करुन स्टॅम्प केला होता.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्री. पी. ए. महाजन यांचेमार्फत सुरु,</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी राहायला स्वतंत्र असून माझा भाऊ देखील वेगळा राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाचे व माझे घर स्वतंत्र असून आमचे व्यवहार देखील वेगवेगळे आहेत. आनंदा शिवराम पाटील हे डॉ. डी. वाय. पाटील साखर कारखाना गगनबावडा येथे नोकरीस आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. सामनेवाला हे अर्जदार यांना नांदवून घेण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २४.०७.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा